# FAQ For Export

कृषि मालाची एका देशातून दुस-या देशात निर्यात होत असताना किडी व रोगाचा प्रसार तसेच त्यावर नियंत्रण रहावे म्हणून जागतीक अन्न संघ्टनेच्या मार्गदर्शनाखाली सन १९५१ मध्ये आंतरराष्ट्रीय पिकसंरक्षण करार करण्यात आलेला आहे. (International Plant Protection Convection 1951) हा करार आंतारराष्ट्रीय पिक संरक्षण करार म्हणून ओळखला जातो. सदर कराराचा मुख्य अद्येश असा आहे की, कृषि माल निर्यातीदवारे मानव, प्राणी व पिकांची हानी होउ नये तसेच त्यांच्या संरक्षणासाठी व ग्राहकांच्या आरोग्याच्या हितासाठी योग्य त्या कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचा अधिकार प्रत्येक सदस्य देशास आहे. सध्या १६५ देश सदर कराराचे सदस्य असून भारत देश ही सदस्य आहे.

जागतीक व्यापार संघटनेदवारे सदर कराराची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. आंताराष्ट्रीय पिक संरक्षण करारानुसार एका देशातून दुस-या देशात मालाची निर्याती करीता फायटोसॅनिटरी सर्टिफिकेट (किड व रोग मुक्त प्रमाणपत्र) घेणे बंधनकारक आहे. राज्यातील कृषि मालाची निर्यात लक्षात घेउन केंद्र शासनाने अधिसुचना क्रमांक पीपीआय/९७/दि. २९.२०.१९९३ अन्वये राज्यातील पुणे, नाशिक, सांगली, सोलापूर, अमरावती, रत्नागीरी, व सिंधुदुर्ग या जिल्हयांतील ११ अधिका-यांना फायटोसॅनिटरी सर्टिफिकेट इश्युंग ॲथॉरीटी म्हणून घोषितकेले आहे.

खुल्या जागतिक व्यापारामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये कृषिमाल निर्यातीकरीता मोठया प्रमाणात संधी निर्माण झाल्या आहेत. त्याचबरोबर आव्हानेही आहेत. राज्यातून विशेषतः ताजी फळे व भाजीपाल्याचे मोठया प्रमाणात निर्यात होत आहे. त्यामध्ये द्राक्ष, आंबा, डाळिंब, कांदा तसेच इतर भाजीपाल्याचाही समावेश आहे. द्राक्ष निर्यातीमध्ये शेतक-यांचे मोठे योगदान आहे. द्राक्षाप्रमाणेच इतर फळे व भाजीपाला व कृषिमाल निर्यात करण्याकडे / निर्यातक्षम माल उत्पादन करण्याकडे शेतक-यांचा विशेष कल वाढत आहे. परंतु सध्या जागतिक बाजारपेठेमध्ये कृषिमाल निर्यातीकरीता अनुसरावयाची कार्यपध्दती, नियम इत्यादिबाबतची अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत शेतक-याची मागणी वाढत आहे.

**निर्यात म्हणजे काय?**

एका देशातून दुस-या देशात कृषिमाल पाठविणे याला निर्यात असे म्हणतात.

**कृषिमाल निर्यातीमध्ये कोणकोणत्या बाबीचा समावेश होतो?**

कृषिमाल निर्यातीमध्ये दोन प्रकार आहेत. एक प्रक्रिया न केलेला कृषिमाल. त्यामध्ये फळे, भाजीपाला, धान्य, रोपे, कलमे, बियाणे इत्यादिचा समावेश होतो. दुस-या प्रकारामध्ये कृषिमालावर आधारित प्रक्रिया केलेले पदार्थ. त्यामध्ये मँगो पल्प, काजू, लोणचे इत्यादिचा समावेश होतो.

**कृषिमाल निर्यात कोण करु शकतो?**

कृषिमालाची निर्यात उत्पादक, शेतकरी, सहकारी संस्था, खाजगी कंपनी इत्यादि करु शकतात मात्र ज्या नावाने निर्यातीचा व्यवसाय करावयाचा आहे त्या नावाने संबंधिताकडे आयात-निर्यात क्रमांक असणे आवश्यक आहे.

**कृषिमाल निर्यात करण्याकरीता जागतिक स्तरावर कोणत्या यंत्रणेमार्फत नियंत्रण केले जाते.**

कृषिमालाची आयात व निर्यातीद्वारे किडी व रोगाचा तसेच तणाचा प्रसार होऊ नये म्हणून सन १९५१ साली आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करार करण्यात आलेला आहे. सदर कराराचा मुख्य उद्देश असा आहे की, एका देशातून दुस-या देशात कृषिमालाच्या निर्यातीद्वारे किडी व रोगाचा तसेच तणाचा प्रसाराद्वारे संबंधित देशातील मानव, प्राणी व पिकावर अनिष्ठ परिणाम होऊ नये त्याकरीता नियमावली करण्यांत आलेली आहे. सदर करारानुसार कृषिमालाचे आयात व निर्यातीकरीता सॅनिटरी व फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यांत आलेले आहे. सर्व सदस्य देशांना सदर कराराचे पालन करणे बंधनकारक करण्यांत आलेले आहे. भारत देश हा सदर कराराचा एक सदस्य देश आहे.

**आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करार व जागतिक व्यापार संघटना याचा संबंध आहे काय?**

आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करार हा १९५१ साली करण्यांत आलेला आहे त्याचे सध्या १७० देश हे सदस्य आहेत. जागतिक व्यापार संघटनेमध्ये सन १९९५ साली कृषि हा विषयाचा समावेश करण्यांत आलेला आहे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध करार करण्यांत आलेले आहेत त्यामध्ये ॲग्रीमेंट ऑन ॲग्रीकल्चर, ॲग्रीमेंट ऑन सॅनिटरी आणि फायटोसॅनिटरी मेझर्स, ॲग्रीमेंट ऑन टेक्नीकल बॅरिअर ऑन ट्रेड, ट्रीम्स् अँड ट्रीप्स् इत्यादिचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करार ही जागतिक व्यापार संघटनेअंतर्गत कृषि विषयक नियमावली तयार करणारी व मार्गदर्शन करणारी अधिकृत संस्था आहे. सदर संस्थेच्या मार्गदर्शनाखाली सॅनिटरी व फायटोसॅनिटरीचे नियमावली तयार करण्यांत आलेली आहे.

**सॅनिटरी आणि फायटोसॅनिटरी मेझर्सचा मुख्य उद्देश आणि प्रमुख तरतूदी काय आहेत?**

सॅनिटरी व फायटोसॅनिटरी करारामध्ये एकूण १४ बाबींचा समावेश करण्यांत आलेला आहे त्यामध्ये प्रामुख्याने मानव, प्राणी, वनस्पती व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून व त्यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून प्रत्येक सदस्य देशांना शास्त्रीय कारणाच्या दृष्टीकोनातून कृषिमालाच्या आयात व निर्यातीकरीता स्वतःची नियमावली करुन बंधन घालण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये उदाहरण दयावयाचे झाल्यास युरोपियन देशांनी कृषिमाल आयात करताना किडनाशक उर्वरित अंशचे प्रमाण क्षम्य मर्यादेच्या आत ठेवण्याचे स्वतःचे निकष ठरविलेले आहेत. त्यामुळे निर्यातदार देशांना ज्या देशांना कृषिमाल निर्यात करावयाचे आहे त्या देशातील नियम व अटीची पूर्तता करणे बंधनकारक झालेले आहे.

**सॅनिटरी आणि फायटोसॅनिटरी कराराची सध्या अंमलबजावणी कशाप्रकारे केली जाते?**

सॅनिटरी व फायटोसॅनिटरी कराराची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सन १९९७ साली फायटोसॅनिटरी कमिशन स्थापन करण्यांत आले होते. सदर कमिशनद्वारे इंटरनॅशनल स्टँडर्ड फॉर फायटोसॅनिटरी मेझर्स (आयएसपीएम) द्वारे १८ नवीन मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने कृषिमाल निर्यातीकरीता फायटोसॅनिटरी प्रमाणीकरणाची पध्दत, किडी व रोगाचे सर्वेक्षण करणे, कीड व रोग मुक्त एरिया घोषित करणे, पेस्ट रिस्क ॲनालिसीस करणे, लाकडी वेस्टणाकरीता मिथाईल ब्रोमाईड धुरीकरणाची पध्दत व इतर बाबी संदर्भात मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी ही प्रगत, प्रगतशील व अप्रगत सदस्य देशांमार्फत प्रभावीपणे करण्यांत येत आहे. त्यामध्ये विविध कॉरनटाईन किडी व रोगमुक्त असल्याबाबतचे हमीपत्राची मागणी होत आहे. म्हणूनच युरोगॅप, हैसब, सेंद्रीय प्रमाणीकरण, बीआरसी, एमपीएस इत्यादि सुधारित प्रमाणीकरणाची मागणी जागतिक बाजारपेठेमध्ये वाढत आहे.

**निर्यातक्षम कृषिमाल उत्पादन करण्यासाठी शेतक-यांनी काय काळजी घेतली पाहिजे?**

सध्या ग्राहकामध्ये जागरुकता निर्माण झालेली आहे. ग्राहकांना विविध दृष्टीकोनातून हमी देण्याची जागतिक बाजारपेठांमध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे युरोपियन युनियन मधील ११८ घाऊक व्यापा-यांनी एकत्र येऊन (फार्म टू फोर्क) शेतातील उत्पादनापासून ग्राहकापर्यंत कृषिमालाच्या गुणवत्तेसंदर्भात हमी देण्यासाठी युरोप गॅप प्रमाणीकरणाची पध्दत विहित केलेली आहे.

निर्यातक्षम कृषिमाल उत्पादन करताना सदरचा माल कोणत्या देशांना कोणामार्फत निर्यात करावयाचे आहे त्या दृष्टीकोनातून कृषिमालाचे उत्पादन करताना किडी व रोगाचे नियंत्रण, कृषिमालातील उर्वरित अंशचे नियंत्रण, कृषिमालाची प्रतवारी इत्यादि बाबीवर विशेष भर देणे आवश्यक आहे.

**निर्यातक्षम कृषिमालाचे उत्पादनाकरीता किडी व रोगांचे नियंत्रण कशाप्रकारे करणे आवश्यक आहे.**

कृषिमालाची गुणवत्ता टिकविण्यासाठी किडी व रोगाचे प्राथमिक अवस्थेमध्येच नियंत्रण केल्यासच शक्य होणार आहे त्याकरीता पिकावरील प्रमुख किडी व रोगाचे नियंत्रण करण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दतीचा प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शिफारस केलेल्या औषधांची एकसारखी फवारणी न करता आळीपाळीने करणे व त्याचे रेकॉर्ड ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**नव्याने कृषिमाल निर्यात करण्यासाठी कोणकोणत्या बाबीची पूर्तता करावी लागते.**

कृषिमाल निर्यात करण्याकरीता निर्यातदार बनण्यासाठी खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

(१) प्रोपरायटी फर्म / संस्था / कंपनी स्थापन करणे.

(२) ज्या नावाने कृषिमाल निर्यात करावयाचे आहे त्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत चालू खाते असणे.

(३) परमनंट अकौंट नंबर (पॅन नंबर)

(४) आयात-निर्यात कोड नंबर

(५) अपेडा रजिस्ट्रेशन इत्यादि महत्वाची कागदपत्रे निर्यातदार बनण्यासाठी आवश्यक आहेत.

**आयात-निर्यात क्रमांक काय असतो आणि तो कोणामार्फत दिला जातो.**

व्यवसायिक दृष्टीकोनातून निर्यात करण्यासाठी प्रत्येक निर्यातदाराकडे आयात - निर्यात क्रमांक (आयईसी कोड नंबर) असणे आवश्यक आहे. सदरचे क्रमांक हे कायमस्वरुपी असते व वाणिज्य मंत्रालय अंतर्गत जाईंट डायरेक्टर फॉरेन ट्रेड यांचे कार्यालयामार्फत आयात-निर्यात क्रमांक दिला जातो. महाराष्ट्रामध्ये पुणे व ठाणे येथे त्यांची कार्यालये आहेत. सदरचे आयात-निर्यात क्रमांक काढण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज, अर्जदारांचा पूर्ण पत्ता, बँकेचे अकाऊंट चालू असल्याबाबत बँकेचे प्रमाणपत्र, पॅन नंबर व रु.२५०/- चा डिमांड ड्राफ्ट भरल्यानंतर इत्यादि माहिती दिल्यानंतर साधारणतः १५ ते २० दिवसांमध्ये हा क्रमांक दिला जातो.

**निर्यातीच्या कागदपत्रामध्ये अपेडाचे रजिस्ट्रेशन करणे व त्याचे महत्व**

अपेडा (ॲग्रीकल्चरल प्रोसेस प्रोडक्ट एक्सपोर्ट डेव्हलमेंट ॲथॉरिटी) ही वाणिज्य मंत्रालय अंतर्गत निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन केलेली संस्था आहे. सदर संस्थेचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असून विभागीय कार्यालय वाशी (मुंबई) येथे आहे. अपेडाकडे नोंदणी करण्यासाठी बँकेत अकौंट चालू असल्याबाबतचे बँकेचे पत्र, पॅन नंबर, आयईसी कोड नंबर, उत्पादक निर्यातदार करीता कृषि विभागाचे ग्रोअर प्रमाणपत्र व रु.५,०००/- चा डिमांड ड्राफ्ट्र इत्यादि माहिती दिल्यानंतर कायमस्वरुपी उत्पादक निर्यातदार म्हणून अपेडाचे सदस्य होता येते. सदस्य होण्याचा मुख्य फायदा असा आहे की, अपेडाच्या वेबसाईटवर आपली उत्पादक निर्यातदार म्हणून नोंद केली जाते. अपेडाची वेबसाईट ही जगामध्ये सर्व आयातदारामार्फत वापरली जाते तसेच आयातदाराची निवड करताना खात्रीलायक निर्यातदार म्हणून ओळख होण्यास मदत होते.

**आयातदाराची निवड कशी करावयाची व तो खात्रीलायक असल्याबाबतची शहानिशा कशाप्रकारे करण्यांत येते.**

नव्याने निर्यात करीत असताना निर्यातदारांच्या मनामध्ये बरेच प्रश्न निर्माण होतात त्यामध्ये प्रामुख्याने माझा माल व्यवस्थितपणे निर्यात होतो का? निर्यात करताना मालाचे नुकसान झाल्यास

तसेच आयातदार खात्रीलायक आहे किंवा नाही, तो खरंच सर्व पैसे देईल किंवा नाही, इत्यादि प्रश्न निर्माण होतात. तसेच काही वेळा सध्या निर्यातीमध्ये कार्यरत असलेल्या यंत्रणेमार्फतही भितीचे वातावरण निर्माण केले जाते. कृषिमाल निर्यात करताना योग्यप्रकारे नियोजन करुन सर्व कागदपत्रांची योग्यप्रकारे पूर्तता केल्यास निर्यातीद्वारे अधिक मोबदला मिळण्यास मदतच होणार आहे. आयातदार निवडताना तो आयातदार खात्रीशीर व नोंदणी करीत असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देशनिहाय व कमोडिटीनिहाय आयातदारांची माहिती त्यांचे पत्ते, दुरध्वनी क्रमांक, ईमेल, व संपर्क व्यक्तीची नांवे इत्यादि माहिती अपेडाचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. त्या व्यतिरिक्तही इतर आयातदारामार्फतही आपल्याला कृषिमाल निर्यात करता येतो त्याकरीता आयातदार व निर्यातदारामध्ये करार करणे आवश्यक आहे. त्यालाच मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडीग म्हणतात.

**आयातदार व निर्यातदारामध्ये करण्यांत येणा-या करारामध्ये प्रामुख्याने कोणत्या बाबीचा समावेश असतो.**

निर्यातदार व आयातदार यांच्यामध्ये करण्यांत आलेल्या करारामध्ये प्रामुख्याने कृषिमालाची गुणवत्ता, कॉनटिटी (साठा), किंमत, क्वॉरनटाईन रिक्वायरमेंट त्यामध्ये कीड, रोग, किडनाशक उर्वरित अंश मर्यादा, मालाची प्रतवारी, पॅकिंग, पुरवठा करावयाचा कार्यक्रम व इतर बाबीचा समावेश असतो.

**आयातदाराची शहानिशा करण्याकरीता यंत्रणा कार्यरत आहे काय?**

आयात निर्यात हा दोन व्यक्ती / संस्थेतील आर्थिक व्यवहार आहे तो व्यवहार विश्वासार्हतेने वाढत असतो परंतु ब-याच वेळा नवीन निर्यातदारांना भिती वाटत असते की खरेच आयातदार करारानुसार योग्य गोष्टीचे पालन करेल किंवा नाही त्यासाठी निर्यातदाराने ज्या आयातदाराशी करार केलेला आहे त्या संदर्भात शहानिशा करण्यासाठी एक्सपोर्ट क्रेडीट कार्पोरेशनकडे (ECGC) रितसर नोंदणी केल्यास सदर संस्थेद्वारे आयातदाराची चौकशी करुन आयातदारामार्फत ९० टक्के रक्कम अदा करण्याची जबाबदारी घेतली जाते. विशेषतः नवीन निर्यातदारांनी सदर सुविधेचा लाभ घेणे आवश्यक आहे.

**कृषिमालाची निर्यात कोणकोणत्या मार्गे करण्यात येते.**

कृषिमालाची निर्यात प्रामुख्याने जहाजाद्वारे, विमानाद्वारे, कुरिअरद्वारे व रोडद्वारे केली जाते. राज्यात जहाजाद्वारे मुंबई येथील जे.एन.पिटी येथून तसेच विमानाद्वारे मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद येथील विमानतळावरुन व छोटया प्रमाणात पार्सलद्वारे विविध कुरिअर संस्थेद्वारे माल पाठविला जातो.

**कृषिमालाचे निर्यातीकरीता पॅकिंग, ग्रेडींग व स्टपींग करण्याकरीता कोणाची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

राज्यातून स्टपींग करण्याकरीता वाणिज्य मंत्रालयांतर्गत देशात एकूण ४३ ठिकाणी आयसीडी (इनलँड कंटेनर डेपो) ची व्यवस्था करण्यांत आलेली आहे त्यामध्ये राज्यातील मुंबई, दिघी (पुणे),

औरंगाबाद, मिरज, नागपूर, भुसावळ या ठिकाणी आयसीडीच्या सुविधा आहेत. या व्यतिरिक्त इतर ठिकाणी निर्यातक्षम मालाची स्टपींग करण्याकरीता ज्या ठिकाणी उदा.पॅक हाऊस, कोल्ड स्टोरेज व इतर ठिकाणाकरीता एक्ससाईज डिपार्टमेंटकडून परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी घेतल्यानंतरच सदर मालाचे कंटेनरचे सिलींगची कार्यवाही एक्ससाईज डिपार्टमेंट मार्फत केली जाते.

**मालाच्या निर्यातीकरीता जहाजांची नोंदणी करणे व इतर कागदपत्रे तयार करण्यासाठी कोणामार्फत मदत केली जाते.**

कस्टम विभागामार्फत सदर कामाकरीता अधिकृत सीएचए. ची नियुक्ती करण्यांत येते अशा अधिकृत सीएचएची निवड करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. सदर सीएचए निर्याती संदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे तयार करण्याचे काम  कमिशन बेसीसवर करत असतात.

**कृषिमाल निर्यातीकरीता फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्याचे काम कोणामार्फत केले जाते.**

केंद्र शासनाने कृषिमाल निर्यातीकरीता आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करारातील तरतूदीनुसार व सॅनिटरी व फायटोसॅनिटरी मेझर्स अंतर्गत फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्यासाठी केंद्र शासनाच्या अधिका-यांना फायटोसॅनिटरी ॲथॉरिटी म्हणून अधिसूचित केले आहे. राज्यातील निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी व स्थानिक स्तरावरुन ज्या भागातून मोठया प्रमाणात निर्यातक्षम उत्पादन घेतले जाते त्या भागातील निर्यातदारांना त्याच ठिकाणावरुन फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र मिळण्याचे दृष्टीकोनातून केंद्र शासनाने राज्य शासनाच्या ११ अधिका-यांना फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देणारे अधिकारी म्हणून अधिसूचित केले आहे त्यामध्ये **पुणे, नासिक, सांगली, सोलापूर, अमरावती व रत्नागिरी** या जिल्हयाचा समावेश आहे. या व्यतिरिक्त मुंबई व नागपूर येथून केंद्र शासनाच्या अधिका-यामार्फत फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था आहे.

**फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र मिळण्यासाठी निर्यातदाराने कोणत्या बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र मिळण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) विहित नमुन्यात अर्ज

२) आयातदार व निर्यातदारामध्ये करण्यांत आलेल्या कराराची प्रत

३) प्रोफार्मा इनव्हाईस

४) पॅकिंग लिस्ट

५) आयईसी कोड

६) कृषिमालाच्या गुणवत्तेबाबत आयातदार देशाच्या क्वारनटाईन संदर्भात विशेषतः किड रोग, किडनाशक उर्वरित अंश इत्यादिबाबत अटी असल्यास त्याची माहिती व विहित केलेली फी
देणे आवश्यक आहे व इतर माहिती देणे आवश्यक आहे.

**फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र कोणाच्या नावाने दिला जातो.**

फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र असल्याशिवाय कृषिमालाची निर्यात करता येत नाही. जर एखादयाने कृषिमालाची निर्यात केली असल्यास त्याला ज्या देशात माल पाठविला आहे त्या देशामध्ये माल पोहोचल्यानंतर त्या देशातील आयातदारांना फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र असल्याशिवाय माल दिला जात नाही. फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र हे ज्या देशाला माल निर्यात करावयाचा आहे त्या देशाच्या नावाने संबंधित आयातदार व निर्यातदाराचे नाव व इतर मालाबाबतचा सविस्तर तपशील नमूद करुन आयातदार देशाच्या नावाने दिला जातो. सदरचे प्रमाणपत्र हे निर्यात होणा-या मालाची गुणवत्ता, कीड रोग मुक्त असल्याबाबतचे हमी देणारे प्रमाणपत्र आहे.

**कृषिमाल निर्यातीमध्ये आयटीचा वापर कितपत करण्यांत येतो.**

हा अत्यंत चांगला प्रश्न आहे. आज सगळया क्षेत्रामध्ये संगणकाचा वापर मोठया प्रमाणावर होत आहे. निर्यात क्षेत्रामध्येही त्याचा वापर करण्यांत येत आहे. राज्यात विशेषतः युरोपियन देशांना द्राक्ष निर्यातीकरीता आयटीचा चांगल्याप्रकारे उपयोग करण्यांत येत आहे. ज्या शेतक-यांना निर्यातक्षम द्राक्षाचे उत्पादन घ्यावयाचे आहे व निर्यात करावयाचे आहे त्यांच्या द्राक्ष बागांची नोंदणी, नोंदणीकृत द्राक्ष बागांची तपासणी, द्राक्ष बागेवरील किडी व रोगाचे नियंत्रण करण्याकरीता वापरण्यात आलेल्या औषधांची माहिती, निर्यातीस योग्य असल्याबाबत बागेची तपासणी, उर्वरित अंश तपासणीकरीता नमुने घेणे, उर्वरित अंश तपासणी, एगमार्क प्रमाणीकरण व फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही अपेडाचे वेबसाईटवरुन ऑनलाईनद्वारे करण्यांत येत आहे. त्यामुळे द्राक्ष निर्यातदारांना चालू वर्षी फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र मिळण्याकरीता विहित केलेले अर्ज इलेक्ट्रॉनिकद्वारेच संबंधित अधिका-याकडे देणे बंधनकारक करण्यांत आलेले आहे. त्यामुळे चालू वर्षी द्राक्ष निर्यातीकरीता निर्यातदारांना कमीतकमी माहिती दयावी लागणार आहे व उर्वरित सर्व संबंधित माहिती वेबसाईटद्वारे उपलब्ध होणार असल्याने द्राक्ष निर्यातीमध्ये गती येण्यास मदतच होणार आहे. तसेच सदर पध्दतीच्या अवलंबवनामुळे द्राक्ष निर्यातीमध्ये पारदर्शकता निर्माण होऊन चांगल्या दर्जाचा माल निर्यात करण्यास मदत होणार आहे.

**कृषिमाल निर्यातीमध्ये पॅकिंगला महत्व ?**

कुठल्याही मालाची निर्यात करताना निर्यात करण्यांत आलेला माल ग्राहकापर्यंत सुस्थितीत पोहोचण्याच्या दृष्टीकोनातून पॅकिंगला विशेष महत्व असते. म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये मालाची आयात निर्यात करताना त्याचे पॅकिंग, पॅकिंग मटेरियलची गुणवत्ता, पॅकिंग केलेल्या मालाबाबत नमूद करावयाची माहिती इत्यादि बाबत निकष ठरविण्यांत आलेले आहेत त्यानुसारच उच्च दर्जाचे पॅकिंग मटेरियल वापरणे बंधनकारक आहे. कृषिमाल हा नाशवंत असल्याने त्याचे पॅकिंग करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. चालू वर्षी द्राक्ष निर्यातीकरीता द्राक्षाच्या पॅकिंगवर बारकोड नमूद करण्यांत येणार आहे. आणि बारकोडचाही वापर सर्व क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर वाढत आहे. सध्याच्या सुपर माल वितरण साखळीमध्ये मालाची विक्री करण्याकरीता बारकोडला विशेष

महत्व प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर एचएस कोड याचाही वापर येथून पुढे करणे आवश्यक आहे. कारण जागतिक बाजारपेठेत मालाची ओळख ही एचएस कोडवरुन करण्यांत येते.

**कृषिमाल निर्यातीकरीता निर्यातदाराकडे कोणत्या सुविधा असणे आवश्यक आहे.**

कृषिमाल हा नाशवंत असल्याने त्याचे काढणी, प्रतवारी, पॅकिंग, ग्रेडींग, प्रिकुलींग व शितग्रहण करण्याकरीता उत्तम दर्जाचे पॅक हाऊस व कोल्ड स्टोरेज असणे आवश्यक आहे आणि सदरचे पॅक हाऊसमध्ये सुरक्षितता व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून अपेडाचे प्रमाणपत्रही असणे आवश्यक आहे. जर एखादया निर्यातदाराकडे त्या सुविधा नसल्यातरी तो इतरांच्या सुविधांचा भाडे तत्वावर वापर करु शकतो.

--------00000-------